जनसंपर्क कक्ष

26 MAR 2026

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : आंतर विभागीय रग्बी स्पर्धेतील विजेत्या न्यू कॉलेजला डॉ. शरद बनसोडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी दीपक पाटील, अमर सासने आदी उपस्थित होते.

# कोल्हापूरच्या न्यू कॉलेजला विजेतपद

## आंतरविभागीय रग्बी स्पर्धा : भोगावती महाविद्यालयाला उपविजेतपद

गडहिंग्लज, ता. २५ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला रग्बी स्पर्धा झाली. या स्पर्धेत न्यू कॉलेजने (कोल्हापूर) विजेतपद पटकावले, तर कुरुकली येथील भोगावती महाविद्यालयाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. शिवाजी विद्यापीठात ही स्पर्धा झाली. येथील ओंकार महाविद्यालयाने संयोजन केले होते.

स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या हस्ते झाले. ओंकार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजन पेडणेकर अध्यक्षस्थानी होते. प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल पाटील प्रमुख उपस्थित होते. न्यू कॉलेज व भोगावती महाविद्यालयात अंतिम सामना झाला. चुरशीच्या लढतीत न्यू कॉलेजने बाजी मारली. भोगावती महाविद्यालयाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. सोळांकूरच्या यशवंतराव पाटील महाविद्यालयाने तिसरा क्रमांक मिळविला.

विजेत्या संघांना डॉ. शरद बनसोडे, दीपक पाटील, अमर सासने यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण झाले. रिद्धी पाटील हिने सूत्रसंचालन केले. स्पर्धा संयोजक सुरेश धुरे यांनी आभार मानले. दरम्यान, आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड करण्यात आली. ही स्पर्धा भुवनेश्वर येथे होणार आहे.

26 MAR 2026

तरूण भारत



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना डॉ. अविनाश सांगोलेकर सोबत डॉ. रणधीर शिंदे व उदयप्रकाश संत.

# डॉ. दु. का. संत यांचे लेखन आजही दिशादर्शक

■ -डॉ. अविनाश सांगोलेकर

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी होते. त्यांनी काळाच्या पुढचा विचार करून केलेले लेखन आजही दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. दु.का. संत व्याख्यानात ते बोलत होते.

'डॉ. दु. का. संत: जीवन आणि कार्य" या विषयावर बोलताना सांगोलेकर यांनी डॉ. दु. का. संत यांच्या कार्याविषयी जीवनातील अनेक पैलु उलगडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

सांगोलेकर म्हणाले, दु. का. संत यांचे सर्व लेखन मौलिक आहे. संत हे व्रतस्थ संशोधक आणि समीक्षक होते. स्त्री मुक्ती संदर्भातील त्यांचे लेखन मौलिक स्वरूपाचे असून त्याला चिंतनाची जोड आहे.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, दु. का. संत संशोधनातील पहिल्या पिढीचे अग्रदुत आहेत. संशोधन क्षेत्रातील त्याचे कार्य हे मूलभूत स्वरूपाचे असून त्यांच्या सर्व लेखनामधून आस्था, जिव्हाळा आणि शिस्तीचा प्रत्यय येतो. या व्याख्यानासाठी विशेष उपस्थित असणारे दु. का. संत यांचे चिरंजीव उदयप्रकाश संत यांनी संत यांच्या आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, दु. का. संत यांचे लेखन आजच्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आहे. तसेच, काळाच्या पुढचा विचार करून लिहिणारा लेखक दुर्लक्षित राहिला याची खंत आहे. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीता संत, अमृता पाटील, शाल्मली संत, अभिजीत पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. पी. आर. गावडे आदी उपस्थित होते.

# 'सरोजिनी फार्मसी'मध्ये राष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधाचे सादरीकरण

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर ता. २६ : सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, शिवाजी विद्यापीठ यांच्या अर्थसाह्य केलेल्या 'भारतीय ज्ञान प्रणाली व आधुनिक वैद्यकशास्त्री यांचे एकात्मिकरण' यावरील राष्ट्रीय पातळी परिषदेला प्रतिसाद लाभला. सार्वजनिक कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आयोजन केले होते.

परिषदेत आठ राज्यांतून फार्मसी महाविद्यालयातील तीनशेहून अधिक डी. फार्मसी, बी. फार्मसीतील विद्यार्थी, प्राध्यापक, पीएच.डी. रिसर्च स्कॉलर यांनी ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने शोधनिबंध आणि पोस्टरचे सादरीकरण केले. प्रत्येक गटात विजेते, उपविजेते अशी बक्षिसे दिली. बाह्य परीक्षक डॉ. विक्रम पोतदार, डॉ. किरण पाटील यांनी परीक्षण केले. प्रभारी कुलगुरू डॉ. ज्योती पी. जाधव, वक्ते प्रा. के. एस. लड्डा, डॉ. बनाप्पा उंगर, डॉ. प्रमोद एच. जे., बी. सी. काहेर, डॉ. योगेश्वर आर. चीप्पा, प्राजक्ता देशपांडे, तावडे संस्थेच्या




कोल्हापूर : राष्ट्रीय परिषदेत उपस्थित डॉ. आदित्य अरविंदेकर, शोभा तावडे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. अनिलकुमार कुलकर्णी, डॉ. सचिन पाटील, भुषण वर्णे.

अध्यक्षा शोभा तावडे, संचालक डॉ. अनिलकुमार कुलकर्णी, प्राचार्य डॉ. आदित्य अरविंदेकर उपस्थित होते. डॉ. जाधव यांनी वनस्पती वर्गीकरण, सूक्ष्मजीवशास्त्र, जीवरसायनशास्त्र या क्षेत्राबद्दल माहिती देत संशोधनासाठी उपलब्ध संधींचा लाभ करून घेण्याचे आवाहन केले. पारंपरिक औषधप्रणाली असो वा आधुनिक. कोणतेही औषध सजीवांवरील औषध शास्त्रीय प्रमाणीकरणाशिवाय सुरक्षित ग्राह्य धरले जात नाही. त्यामुळे प्रमाणीकरणाचे योग्य, प्रशिक्षण घेण्यास डॉ. उंबर यांनी प्रोत्साहित केले. डॉ. प्रमोद यांनी इथनॉ मेडिसिन म्हणजेच पारंपरिक औषध प्रणालीचे महत्व सांगितले. डॉ. सचिन पाटील, सहायक प्रा. भूषण वर्णे यांनी नियोजन केले. प्रा. सौनिषिता वाणी, श्रेष्ठ कदम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुचिता चौधरी यांनी आभार मानले.

2 6 MAR 2026

सकाळ

# तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कार्यवाह कुलगुरुपदी डॉ. आर. के. कामत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : राज्यपाल तथा कुलपती जिष्णू देव वर्मा यांच्या आदेशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे येथे प्रा. डॉ. आर. के. तथा राजनिश कमलाकर कामत यांनी आज कार्यवाह कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला.

या तंत्रज्ञान विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी राजीनामा दिल्याने कुलपतींनी डॉ. कामत यांच्या अतिरिक्त कार्यभार सोपविला. डॉ. कामत यांना २८ वर्षांहून अधिक कालावधीचा अध्यापन, संशोधन व प्रशासनाचा अनुभव आहे. सध्या ते डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबईचे कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी शिवाजी विद्यापीठात विज्ञान व तंत्रज्ञान संकुलाचे अधिष्ठाता तसेच संगणक विज्ञान विभागप्रमुख म्हणून काम केले आहे. त्यांनी यापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाईन येथे कार्यवाह कुलगुरू पदाची जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या नावावर दोनशेहून अधिक संशोधन निबंध, अनेक पेटंट्स आहेत.



डॉ. आर. के. कामत

दरम्यान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या विद्यापीठासाठी मी पूर्ण समर्पणाने आणि निष्ठेने कार्य करीन. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि सामाजिक बांधिलकी यांना केंद्रस्थानी ठेवून विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करेन, अशी प्रतिक्रिया डॉ. कामत यांनी व्यक्त केली.

26 MAR 2026
पुढारी

# डॉ. जत्राटकर यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संविधान जागर' व्याख्यानमाले अंतर्गत गुरुवारी (दि. २६) सकाळी ११ वाजता विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर 'भारतीय संविधानातील नागरिकांचे स्थान' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.